स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

यशस्वी १९ वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

होळी

होळीच्या पवित्र अग्निमध्ये, निराशा, दारिद्र्य, आळस यांचे दहन होवो आणि सर्वांच्या आयुष्यात आनंद, सुख, आरोग्य आणि शांति नांदो.

होळी पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा !

होळी आणि धुलीवंदनाच्या सर्व वाचकांना हार्दिक शुभेच्छा. या निमित्त उद्या प्रकाशित होणारा 'वास्तव' चा अंक अंक प्रकाशित होणार नाही याची वाचकांनी नोंद घ्यावी. -संपादक

# नियती हिशोब करायला विसरत नाही!

# दोन वर्षापूर्वी लढविलेली खिंड दादा खिंडकरांच्या अंगलट आली!!

## मारहाणीचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर अडचणीत आलेले दादा खिंडकर कॉवत यांना शरण


**पीडित तरुण त्यांना मारहाण न करण्याची विनंती करत आहे. पण त्यानंतरही ते काठी व पट्ट्याने मारहाण करीत होते!!**

**दादा खिंडकर यांची स्वच्छ प्रतिमा असल्यामुळे तरुणाईमध्ये क्रेझ होती, पण ती व्हायरल व्हिडिओमुळे धुळीस मिसळली !**

**टीआरपी वाढविण्यासाठी दादा खिंडकर यांच्या नातेवाईकांना यानिमित्ताने बदनाम करणे, हे अत्यंत चुकीचे!**

बीड : बाभूळवाडी ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच दादा खिंडकर आज बीड पोलिसांना स्वत:हून शरण आलेत. ते गावातील एका तरुणाला बेदम मारहाण करतानाचा एक जुना व्हिडिओ व्हायरल झाल्यामुळे अडचणीत सापडले होते. या प्रकरणी गुन्हा दाखल होताच त्यांनी पोलिसांना शरण जाणे पसंत केले. त्यांनीच एका तरुणाला मारहाण केल्यामुळे संतप्त भावना व्यक्त केल्या जात आहेत. दरम्यान या प्रकरणाची सविस्तर माहिती एका वृत्तपत्राच्या पोर्टलवर प्रकाशित करण्यात आली आहे.





### काय आहे व्हायरल झालेल्या व्हिडिओत?

● व्हायरल झालेल्या व्हिडिओत दिसून येत आहे की, दादा खिंडकर आपल्या इतर 2 सहकाऱ्यांसह एका तरुणाला शेतात बेदम मारहाण करत आहेत. पीडित तरुण त्यांना मारहाण न करण्याची विनंती करत आहे. पण त्यानंतरही ते त्यांना काठी व पट्ट्याने मारहाण करत आहेत. या मारहाणीत ओंकार नामक तरुण रक्तबंबाळ झाला असून, त्याचे शर्टही रक्ताने भिजल्याचे दिसत आहे.

**व्हायरल व्हिडिओ 2 वर्षांपूर्वीचा!**

● यासंबंधीच्या माहितीनुसार, दादा खिंडकर यांचा तरुणाला शेतात मारहाण करतानाचा एक व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाला आहे. हा व्हिडिओ 2 वर्षांपूर्वीचा आहे. पण तो आता व्हायरल झाला. यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी आपल्या अडचणींत भर पडत असल्याचे लक्षात येताच खिंडकर यांनी आज स्वत: बीड पोलिस अधीक्षक कार्यालयात येऊन शरण येणे पसंत केले. सध्या ते पोलिसांच्या एका केबिनमध्ये बसून आहेत. पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतल्याचीही माहिती आहे. पत्रकारांनी त्यांना त्यांच्या शरण येण्याविषयी प्रश्न केला. पण त्यांनी बोलणे टाळले.

### स्वच्छ प्रतिमा मलीन झाली!

● प्रत्येक व्यक्तीशी सौजन्याने आणि अत्यंत नम्रतेने वागणारे सरपंच म्हणून दादा खिंडकर यांना बीड तालुक्यात ओळखले जाते. एवढेच नव्हे तर एक स्वच्छ प्रतिमा असलेले व्यक्तिमत्व म्हणून दादा खिंडकर यांच्याकडे पाहिले जाते. या बळावरच दादा खिंडकर यांना गावकऱ्यांनी दोन वेळा सरपंच म्हणून निवडून दिले. परंतु, मागील दोन वर्षांपूर्वी जी घटना घडली त्या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यामुळे दादा खिंडकर यांच्या स्वच्छ प्रतिमेला तडे गेले असल्याचे आता बोलले जात आहे.

### टीआरपीसाठी दादा खिंडकर यांच्या नातेवाईकांना बदनाम करू नका!

● दादा खिंडकर यांच्याकडून दोन वर्षांपूर्वी तरुणाला मारहाण करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे. जी चूक दोन वर्षांपूर्वी झाली त्या चुकीबद्दल दादा खिंडकर यांच्या नातेवाईकांना या प्रकारणात टीआरपी वाढविण्यासाठी गोवले जात आहे, हे अत्यंत चुकीचे! विशेष म्हणजे दादा खिंडकर चुकले हि बाब त्यांच्या लक्षात आली आणि ते स्वत:हून पोलिसांना शरण गेले. असे असताना दादा खिंडकर यांच्या नातेवाईकांची बदनामी करणे उचित नाही, अशा भावनाही व्यक्त केल्या जात आहेत.

## गजानन बैंकेच्या संचालक पदी स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष परेश मामा मोरे यांची निवड झाल्याबद्दल




● बीड : गजानन बैंकेच्या संचालक पदी स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष परेश मामा मोरे यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करून शुभेच्छा देताना मराठवाडा निरिक्षक सुमित भैय्या डोंगरे व बीड तालुका अध्यक्ष विशाल इंगोले.

## माजलगाव शहरासह तालुक्यातील मटका बंद करा

### निर्भीड पत्रकार संघाची पोलीस अधीक्षक यांच्या कडे मागणी

माजलगाव : बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांचे बीड जिल्ह्यात आगमन होताच गुटखा, वाळू माफिया, गुंड यांचे धाबे दणाणले गुटखा बंद झाला वाळूची अवैध तस्करी बंद झाली आणि गुंड लपून बसले मात्र माजलगाव तालुक्यातील मटका आजही चालूच आहेत या अवैध मटक्याच्या जुगारा मुळे अनेक गोरगरीब मजूर यांचे संसार उध्वस्त होत आहेत हे पाहून माजलगाव शहरासह तालुक्यातील मटका बंद करावा अशी मागणी माजलगाव पत्रकारांच्या वतीने पोलीस अधीक्षक कावत यांच्या कडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. ● पान ३ वर...

## नाफेड शासकीय हमीभावाने तूर विक्रीसाठी ऑनलाईन नोंदणी सुरू - सभापती रमजान तांबोळी

आष्टी : आष्टी तालुक्यातील तूर उत्पादक शेतकऱ्यांसाठी मतदार संघाचे लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नाने कृषी उत्पन्न बाजार समिती कडा येथे शासकीय तुर खरेदी केंद्राला मंजुरी मिळाली असून सर्व शेतकऱ्यांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह ऑनलाईन नोंदणीसुरू झाली असून ऑनलाईन नोंदणी दि.२४ मार्च पर्यंत करून घ्यावी असे आवाहन बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी यांनी केले आहे. ७५५० प्रति क्विंटल दराने तुर खरेदी केली जाणार आहे. आष्टी मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नाने कडा कृषी उत्पन्न बाजार समितीत नाफेड





अंतर्गत दि महाराष्ट्र मार्केटिंग फेडरेशन यांचे सेवा सहकारी सोसायटी लि. जामगाव ता.आष्टी या शासकीय हमीभाव तूर खरेदीकेंद्रांस मंजुरी मिळाली आहे. या हमीभाव केंद्रात ७५५० प्रति क्विंटल दराने तुर खरेदी केली जाणार आहे. शेतकऱ्यांनी सातबारा व ८ अ मूळ प्रत, आधारकार्ड, बँक पासबुक (चालु खाते द्यावे, जनधन खाते देऊ नये), ऑनलाइन पिकपेरा नोंद असणे आवश्यक इत्यादी कागदपत्रासह प्रत्यक्ष येऊन नोंदणी करण्याचे आवाहन सभापती रमजान तांबोळी यांनी केले आहे. तसेच लवकरच प्रत्यक्ष खरेदी सुरू होणार असून शेतकऱ्यांनी कमी दराने तुरीची विक्री न करण्याचे आवाहन केले आहे.

## छत्रपती शिवपुत्र संभाजी राजे यांच्या बलिदान दिनानिमित्त अभिवादन



बीड : स्वराज्याचे दुसरे छत्रपती शिवपुत्र संभाजी राजे यांच्या बलिदान दिनानिमित्त अभिवादन करताना शंभुप्रेमी

## जिल्ह्यातील शाळा दुपारच्या सत्रात बेकादेशीर रितीने बंद

### ....गावकऱ्यांनो पंचनामे करा - ॲड. अजित देशमुख

बीड (प्रतिनिधी) बीड जिल्हा वेगवेगळ्या कामासाठी सातत्याने गाजत असतो. प्रशासन चांगले चाललेले आहे, हे फक्त कागदावर दाखवण्यात काही अधिकारी लक्ष घालतात. मात्र प्रत्यक्षात आपल्या खाली किती अंधार आहे ? हे पाहिले जात नाही. जिल्ह्यातील अनेक शाळा दुपारच्या सत्रात एक मार्च २०२५ पासून बंद असतानाही कुठलीही कारवाई होत नाही. विद्यार्थ्यांच्या नुकसानीकडे कोण पाहणार ? असा प्रश्न उपस्थित करत प्रत्येक गावातील शालेय शिक्षण समिती, सरपंच आणि गावकऱ्यांनी बंद शाळेचे पंचनामे करून शिक्षकांवर कारवाईची मागणी करावी, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित देशमुख यांनी केली आहे.



यासंदर्भात कुर्ला तालुका बीड येथील तुषार पाटील व अन्य गावकऱ्यांसह इतर काही गावातील लेखी व तोंडी तक्रार देखील प्रशासनाकडे पोहोचलेल्या आहेत. शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्यासह थेट मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे या तक्रारी दिलेल्या आहेत.

शिक्षणाची वाट लावणे, ही गंभीर बाब असताना वरिष्ठ अधिकारी मात्र या तक्रारीकडे गांभीर्याने पाहत नाहीत. त्यामुळे या अधिकाऱ्यांना जागेवर आणण्यासाठी प्रत्येक गावातील गावकऱ्यांनी आपापल्या परीने बंद शाळांचे पंचनामे करणे, त्याचप्रमाणे अँगल कॅम कॅमेरा मध्ये वेळ, तारीख आणि इतर सर्व माहितीसह फोटो घेऊन संबंधित शिक्षक व मुख्याध्यापकांवर कारवाई ● पान ४ वर...






**आ. संदीप क्षीरसागरांनी व्यक्त केली जिल्हावासीयांकडून अपेक्षा**

**● बीड मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडले**

# ना.अजितदादा पालकमंत्री असल्यामुळे पाच वर्षात बीड जिल्ह्याचा बारामतीसारखा विकास होईल

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी) :- यावेळेस ना.अजितदादा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असल्यामुळे पाच वर्षांमध्ये बीड जिल्ह्याचा विकास बारामतीसारखा होईल. अशी अपेक्षा संपूर्ण जिल्ह्यावासीयांकडून आ.संदीप क्षीरसागरांनी व्यक्त केली. विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड मतदारसंघाच्या विकासासाठी अत्यावश्यक असलेले विविध प्रश्न सभागृहात मांडले.

मुंबई येथे महाराष्ट्र विधीमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या सुरू आहे. या अधिवेशनात आ.संदीप क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.१२) रोजी बीड मतदारसंघाच्या विकासासाठी अत्यावश्यक असलेले विविध प्रश्न व कामे सभागृहात मांडली. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यावेळेस ना.अजित दादा पवार आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्याला ना.अजितदादांकडून अपेक्षा आहेत. ना.अजितदादांच्या पुढाकारातून येत्या पाच वर्षांत बीड जिल्ह्याचा विकास बारामतीसारखा होईल अशी लोकभावना जिल्हावासीयांची आहे. अशा शब्दांत आ.क्षीरसागरांनी ना.अजितदादांकडे जिल्ह्याच्या विकासाबाबत अपेक्षा व्यक्त केली.





बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी हद्दपार करायची असेल तर, तरूणांना रोजगार देऊन गुन्हेगारी पासून परावृत्त करावे लागेल. त्यासाठी बीड येथे असलेल्या एमआयडीसीचा विकास होणे गरजेचे आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागरांचा ना.अजित पवारांकडे पाठपुरावा सुरू आहे. मागील काही दिवसांपूर्वीच बीड एमआयडीसीचा प्रस्ताव घेऊन आ.संदीप क्षीरसागर ना.अजितदादांना भेटले होते. त्यावर ना.अजितदादांनी विभागाला निर्देश दिले होते. त्यानंतर बीड येथे उपलब्ध असलेल्या २५० एकर जागेचा सर्वे काही दिवसांपूर्वीच झाला आहे. औद्योगिक वसाहतीसाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबी येथे उपलब्ध आहेत. तसेच मोठ्या उद्योजकांनाही भेटलो असून त्यांनीही याठिकाणी उद्योग उभारण्यासाठी तयारी दर्शवली आहे. त्यामुळे बीड एमआयडीसीच्या विकासासाठी निधी देऊन बळ द्यावे अशी मागणी आ.संदीप क्षीरसागरांनी केली. ● पान ४ वर...

## योगतज्ञ राधा तांबे यांना महिला दिनानिमित्त सेवा रत्न पुरस्कार



बीड : प्रतिनिधी

जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या जागतिक महिला दिनानिमित्त दिला जाणारा पद्मश्री सिंधुताई सपकाळ सेवा रत्न पुरस्कार सोहळा पार पडला. विविध क्षेत्रात अलौकिक कामगिरी करणाऱ्या नारीशक्तीला दरवर्षी सेवा रत्न पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते. योग व निसर्गोपचार तज्ञ (उपचारात्मक योगा) आहार तज्ञ या क्षेत्रामध्ये अतिशय गौरव पूर्ण कामगिरी करणाऱ्या श्रीमती डॉ.राधा तांबे यांचा देखील यानिमित्ताने सेवा रत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. ● पान ४ वर...

विशेष

# आजचे राशिभविष्य: कसा असेल तुमचा आजचा दिवस? जाणून घ्या!



दैनंदिन राशीभविष्य हे रोजच्या घडामोडींचे अंदाज देते, तर साप्ताहिक, मासिक आणि वार्षिक राशीभविष्य यामध्ये अनुक्रमे येता आठवडा, महिना आणि वर्षाचा अंदाज असतो. दैनिक राशिफल हे ग्रह-नक्षत्रांच्या हालचालीवर आधारित एक भविष्यवाणी आहे.

## आजचे राशिभविष्य :

### मेष:

आजचा दिवस तुमच्यासाठी संमिश्र असेल. कामाच्या ठिकाणी काही अडचणी येऊ शकतात. खर्च वाढू शकतात. कुटुंबासोबत वेळ घालवा, ज्यामुळे मन:शांती मिळेल. उत्साहाचा असेल. कामाच्या ठिकाणी नवीन संधी मिळतील. आर्थिक स्थिती सुधारेल. कुटुंबासोबत आनंदाचे क्षण घालवाल.

### वृषभ:

आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला असेल. रखडलेली कामे मार्गी लागतील. नवीन संधी मिळतील. आर्थिक स्थिती सुधारेल. जोडीदारासोबतचे संबंध सुधारतील. कामात व्यस्त राहाल. खर्च वाढू शकतात, त्यामुळे खर्चांवर नियंत्रण ठेवा. कुटुंबातील सदस्यांशी मतभेद होण्याची शक्यता आहे, शांत राहा.

### मिथुन:

आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. कामात व्यस्त राहाल. आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. कुटुंबातील सदस्यांशी संवाद साधा. नवीन लोकांशी संपर्क वाढतील, ज्यामुळे भविष्यात फायदा होईल. जोडीदारासोबत चांगला वेळ जाईल.

### कर्क:

आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला असेल. नवीन योजनांवर काम सुरू करू शकता. आर्थिक स्थिती सुधारेल. कुटुंबासोबत बाहेर फिरायला जाण्याचा बेत आखू शकता. कामाचा ताण वाढू शकतो, पण वेळेवर कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. खर्च वाढू शकतात. आरोग्याची काळजी घ्या.



### सिंह:

आजचा दिवस तुमच्यासाठी उत्तम असेल. कामात यश मिळेल आणि प्रशंसा होईल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील. कामाच्या ठिकाणी सावधगिरी बाळगा. गुंतवणूक करताना विचारपूर्वक निर्णय घ्या. कुटुंबात वाद होण्याची शक्यता आहे.

### कन्या:

आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. कामाचा ताण वाढू शकतो, पण वेळेवर कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. खर्च वाढू शकतात. आरोग्याची काळजी घ्या. नवीन योजनांवर काम सुरू करू शकता. आर्थिक स्थिती सुधारेल. कुटुंबासोबत बाहेर फिरायला जाण्याचा बेत आखू शकता.

### तूळ:

आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य राहील. कामात व्यस्त राहाल. खर्च वाढू शकतात, त्यामुळे खर्चांवर नियंत्रण ठेवा. कुटुंबातील सदस्यांशी मतभेद होण्याची शक्यता आहे, शांत राहा. रखडलेली कामे मार्गी लागतील. नवीन संधी मिळतील. आर्थिक स्थिती सुधारेल. जोडीदारासोबतचे संबंध सुधारतील.

### वृश्चिक:

आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला असेल. रखडलेली कामे पूर्ण होतील. नवीन लोकांशी संपर्क वाढतील, ज्यामुळे भविष्यात फायदा होईल. जोडीदारासोबत चांगला वेळ जाईल. कुटुंबासोबत वेळ घालवा, ज्यामुळे मन:शांती मिळेल. कामात व्यस्त राहाल. आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. कुटुंबातील सदस्यांशी संवाद साधा.

### धनु:

आजचा दिवस तुमच्यासाठी संमिश्र असेल. कामाच्या ठिकाणी अडचणी येऊ शकतात, पण संयमाने काम करा. आर्थिक स्थिती ठीक राहील. आरोग्याकडे लक्ष द्या. कामात यश मिळेल आणि नवीन जबाबदाऱ्या मिळतील. आर्थिक स्थिती मजबूत होईल. मित्रांसोबत चांगला वेळ घालवाल.

### मकर :

आजचा दिवस तुमच्यासाठी संमिश्र असेल. कामाच्या ठिकाणी सावधगिरी बाळगा. गुंतवणूक करताना विचारपूर्वक निर्णय घ्या. कुटुंबात वाद होण्याची शक्यता आहे. कामात यश मिळेल आणि प्रशंसा होईल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील.

### कुंभ:

आजचा दिवस तुमच्यासाठी उत्तम असेल. कामात यश मिळेल आणि नवीन जबाबदाऱ्या मिळतील. आर्थिक स्थिती मजबूत होईल. मित्रांसोबत चांगला वेळ घालवाल. कामाच्या ठिकाणी अडचणी येऊ शकतात, पण संयमाने काम करा. आर्थिक स्थिती ठीक राहील. आरोग्याकडे लक्ष द्या

### मीन :

आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. कामाचा ताण वाढू शकतो, पण वेळेवर कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. खर्च वाढू शकतात. आरोग्याची काळजी घ्या. नवीन योजनांवर काम सुरू करू शकता. आर्थिक स्थिती सुधारेल. कुटुंबासोबत बाहेर फिरायला जाण्याचा बेत आखू शकता. कुटुंबासोबत वेळ घालवा, ज्यामुळे मन:शांती मिळेल.

# क्षमा, प्रेम आणि धैर्याचा दिवस

## रमजानचा बारावा रोजा

रमजान



प्राचार्य अन्वर शेख
सिंदफणा पब्लिक स्कूल, माजलगाव



– रमजानच्या पवित्र महिन्याचा बारावा रोजा उजळला आणि त्यासोबत कुराण मजीदच्या बाराव्या अध्यायाची – सूरह यूसुफची पावित्र्यमय शिकवण रोजेदारांच्या हृदयात नवचैतन्य निर्माण करते. या पवित्र दिवशी, कुराणातील सूरह हूद (आयात ६-१२३) आणि सूरह युसुफ (आयात १-५२) या भागांवर विशेष मनन केले जाते, जे रोजेदारांना आध्यात्मिक ज्ञानाचे अमूल्य मोती प्रदान करतात.

सूरह यूसुफ कुराणातील अशा अध्यायांपैकी एक आहे जिथे एकाच व्यक्तीची संपूर्ण जीवनकथा एकाच अध्यायात विस्तृतपणे वर्णन केली आहे. अल्लाह स्वत: या अध्यायाच्या सुरुवातीलाच फर्मावतो: "आम्ही तुम्हाला सर्वात चांगली कथा सांगत आहोत" (यूसुफ: ३). यामध्ये हजरत यूसुफ (अ.स.) यांचा जन्म, त्यांचे तारुण्य, त्यांच्यावर आलेले संकट, बंधूंकडून झालेला विश्वासघात, गुलामी, तुरुंगवास आणि शेवटी मिसरच्या राज्यपदापर्यंतचा प्रवास सविस्तर वर्णन केला आहे. बाराव्या रोज्याच्या सकाळी, उपवासाची भूक जसजशी जाणवू लागते, तसतसे रोजेदार हजरत यूसुफ (अ.स.) यांच्या जीवनातील संकटांचा विचार करतात. हजरत यूसुफ (अ.स.) यांना त्यांच्या भावांनी मत्सरापोटी विहिरीत फेकले, त्यांना गुलाम म्हणून विकले गेले, त्यांना खोट्या आरोपाखाली तुरुंगात टाकले गेले, परंतु या सर्व परिस्थितीत त्यांनी अल्लाहवरील विश्वास आणि धैर्य कायम ठेवले. "वास्तविक धैर्य हे आहे जे पहिल्या आघातावेळीच दाखवले जाते," असे पैगंबर मुहम्मद (स.अ.व.) म्हणाले आहेत. कुराणाच्या बाराव्या अध्यायाची सुरुवात हजरत यूसुफ (अ.स.) यांनी पाहिलेल्या एका स्वप्नाने होते. त्यांनी आपल्या वडिलांना सांगितले: "हे माझ्या पिता, मी स्वप्नात पाहिले की अकरा तारे, सूर्य आणि चंद्र मला नमस्कार करत आहेत." (यूसुफ: ४). हजरत याकूब (अ.स.) यांनी त्यांच्या मुलाला स्वप्नाची व्याख्या शिकवली आणि त्याच्या भावांना ते सांगू नये अशी सूचना केली, कारण त्यांच्या मनात मत्सर निर्माण होण्याची शक्यता होती. हा प्रसंग रोजेदारांना स्वप्नांचे महत्त्व आणि गुप्तता ठेवण्याचे महत्त्व शिकवतो. सूरह हूदमध्ये आलेले महत्त्वपूर्ण संदेश रोजेदारांना दैवी तरतूद, जबाबदारी आणि सत्यापासून दूर जाण्याच्या परिणामांबद्दल मार्गदर्शन करतात. या आयातींमधील एक मूलभूत शिकवण म्हणजे अल्लाह सर्व प्राण्यांसाठी उपजीविका पुरवतो. पृथ्वीवरील प्रत्येक जीव अल्लाहकडून आपली तरतूद प्राप्त करतो, ज्याला प्रत्येक प्राणी कुठे राहतो आणि तो शेवटी कुठे परतेल हे माहीत आहे. हा विश्वास उपवासाच्या काळात विशेष सांत्वना देतो.

हजरत यूसुफ (अ.स.) यांच्या भावांनी मत्सरापोटी त्यांना विहिरीत फेकले आणि त्यांच्या वडिलांना सांगितले की त्यांना लांडग्याने खाल्ले. यानंतर यूसुफ (अ.स.) यांना एका व्यापाऱ्याने विहिरीतून बाहेर काढले आणि त्यांना गुलाम म्हणून विकले. अशा प्रकारे ते मिसरमध्ये पोहोचले. वर्षांनंतर, जेव्हा संकटात सापडलेले हजरत यूसुफ (अ.स.) यांचे भाऊ त्यांच्याकडे मदतीसाठी आले, तेव्हा यूसुफ (अ.स.) यांनी त्यांना ओळखले, परंतु त्यांनी स्वत:ची ओळख लपवून ठेवली. अखेरीस, जेव्हा त्यांनी स्वत:ची ओळख उघड केली, तेव्हा त्यांच्या भावांना अत्यंत लज्जित वाटले आणि त्यांनी माफी मागितली. हजरत यूसुफ (अ.स.) यांनी त्यांच्या भावांना क्षमा केली आणि म्हटले: "आज तुम्हाला कोणताही दोष दिला जाणार नाही, अल्लाह तुम्हाला क्षमा करो, तो सर्वात दयाळू आहे." (यूसुफ: ९२) म्हणजेच क्षमा करणारा हा शिक्षा देण्यापेक्षा महान असतो यातून सिद्ध होते. बाराव्या रोज्याच्या मध्यान्ही, रोजेदार क्षमेच्या या महान पाठावर चिंतन करतात. जगातील कोणतीही भौतिक शक्ती एखाद्याचे शारीरिक स्वातंत्र्य हिरावून घेऊ शकते, परंतु माफ करण्याची शक्ती फक्त आपल्याच हातात असते. जेव्हा आपण कोणाला माफ करतो, तेव्हा आपण स्वत:लाही द्वेषाच्या बंधनातून मुक्त करतो. समोरच्या व्यक्तीला त्याने केलेल्या चुकीचा पश्चाताप असेल तर त्याला माफ करावे. हजरत यूसुफ (अ.स.) यांच्या जीवनातील एक महत्त्वपूर्ण प्रसंग म्हणजे मिसरच्या अजीज-ए-मिस्र (उच्च अधिकारी) यांच्या पत्नीकडून झालेले मोहाचे आव्हान. हा प्रसंग नैतिकतेचा, पावित्र्याचा आणि अल्लाहविषयी असलेल्या भीतीचा उत्कृष्ट आदर्श सादर करतो. जेव्हा अजीज-ए-मिस्रची पत्नी झुलेखा हिने हजरत यूसुफ (अ.स.) यांना मोह घालण्याचा प्रयत्न केला, तेव्हा त्यांनी अल्लाहचा धावा केला आणि म्हटले: "मी अल्लाहची शरण घेतो, तो (तुमचा पती) माझा स्वामी आहे, त्याने मला चांगले निवासस्थान दिले आहे. निश्चितच, अन्यायकारी यशस्वी होत नाहीत." (यूसुफ: २३) बऱ्याचदा आपण विचार करतो मी हे काम करत असताना कुणीही बघितले नाही परंतु अल्लाह हे सर्व बघत असतो. ती भीती मनामध्ये असणे आवश्यक आहे. बाराव्या रोज्याच्या दुपारी, भुकेच्या आणि तहानेच्या व्याकुळतेत, रोजेदारांना शारीरिक गरजांवर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्व कळते. जसे हजरत यूसुफ (अ.स.) यांनी हलाल-हराम (वैध-अवैध) च्या सीमारेषांचे पालन केले, तसेच रोजा रोजेदारांना आपल्या वासनांवर नियंत्रण ठेवण्याचे प्रशिक्षण देतो. आपण हलाल हा शब्द फक्त मांसाहार बद्दलच वापरतो. परंतु हलाल म्हणजे वैध, मग कुठलेही काम करत असताना ते वैध आहे का याचा विचार आपण करायला पाहिजे. सूरह हूदमध्ये नूह, हूद, सालिह, इब्राहिम, लूत आणि शुऐब यांसह अनेक पैगंबरांची वर्णने आहेत. प्रत्येक कथा हे स्पष्ट करते की या संदेशवाहकांनी त्यांच्या लोकांना केवळ अल्लाहची उपासना करण्यास आणि सद्‌गुणी जीवन जगण्यास सांगितले. नकार, उपहास आणि धमक्यांना सामोरे जावे लागले असतानाही ते आपल्या मिशनमध्ये स्थिर राहिले. या कथांमधील पुनरावर्ती पॅटर्न दर्शवते की दैवी संदेशवाहक स्पष्ट चिन्हे आणि चेतावण्यांसह आले, बहुतेक समुदायांनी प्रथम त्यांचा संदेश नाकारला, नकारात राहिलेल्यांना परिणामांना सामोरे जावे लागले, आणि विश्वासवंतांना दैवी दयेद्वारे वाचवले गेले. हजरत यूसुफ (अ.स.) यांच्या जीवनातील विविध प्रसंग दर्शवतात की अल्लाहवरील विश्वास, धैर्य आणि संयम यांचे फळ अखेरीस मिळतेच. तुरुंगात असताना त्यांनी दोन कैद्यांच्या स्वप्नांचा अर्थ सांगितला. त्यापैकी एकाला मुक्त करण्यात आले, परंतु त्याने यूसुफ (अ.स.) यांना विसरून गेला. परंतु जेव्हा राजाला एक भेदक स्वप्न पडले, तेव्हा त्या कैद्याला यूसुफ (अ.स.) यांची आठवण झाली आणि त्याने राजाला त्यांच्याविषयी सांगितले. हजरत यूसुफ (अ.स.) यांनी राजाच्या स्वप्नाचा अर्थ सांगितला – सात समृद्ध वर्षे येणार आहेत, त्यानंतर सात दुष्काळी वर्षे येणार आहेत. त्यांनी धान्याचा साठा करण्याचाही सल्ला दिला. राजा त्यांच्या सल्ल्याने प्रभावित झाला आणि त्यांना मिसरच्या कोशागाराचा प्रमुख नेमले. कुराण मजीदमध्ये वर्णन केलेली हजरत यूसुफ (अ.स.) यांची कथा एका मार्मिक पुनर्मिलनासह समाप्त होते. त्यांचे वडील हजरत याकूब (अ.स.), जे त्यांच्या अनुपस्थितीत इतके रडले होते की त्यांचे डोळे खराब झाले होते, त्यांच्या मिसरच्या भेटीत, हजरत यूसुफ (अ.स.) यांनी आपल्या वडिलांच्या चेहऱ्यावर आपला शर्ट ठेवला आणि त्यांची दृष्टी परत आली. हजरत यूसुफ (अ.स.) यांनी आपल्या कुटुंबाला मिसरमध्ये आणले आणि त्यांच्या सन्मानार्थ आपले सिंहासन उंच केले. ते सर्व त्यांच्यासमोर नतमस्तक झाले आणि हजरत यूसुफ (अ.स.) यांनी म्हटले: "हे माझ्या पिता, हे माझ्या लहानपणी पाहिलेल्या स्वप्नाचे भाष्य आहे. माझ्या प्रभूने ते खरे केले आहे." (यूसुफ: १००) रात्रीच्या नमाजानंतर, तरावीह मध्ये, रोजेदार सूरह यूसुफच्या शेवटच्या आयतांवर मनन करतात. अल्लाह म्हणतो: "खरोखर, त्यांच्या कथांमध्ये बुद्धिमानांसाठी एक शिकवण आहे." (यूसुफ: १११)

रमजानचा बारावा रोजा हजरत यूसुफ (अ.स.) यांच्या जीवनाच्या धड्यांतून रोजेदारांना अनेक महत्त्वपूर्ण पाठ शिकवतो. जीवनातील कठीण प्रसंगांमध्ये अल्लाहवर विश्वास ठेवा आणि धैर्य दाखवा हा पहिला धडा. आपल्याला त्रास देणाऱ्यांना, आपल्याशी वाईट वागणाऱ्यांना मनापासून क्षमा करणे ही मोठी गुणवत्ता आहे हा दुसरा धडा. मोहाच्या क्षणीही स्वत:च्या नैतिक मूल्यांवर ठाम राहणे महत्त्वाचे आहे असा तिसरा धडा. हजरत यूसुफ (अ.स.) यांनी सत्तेच्या शिखरावर असतानाही आपल्या कुटुंबाला विसरले नाही, त्यांनी कुटुंबाच्या प्रेमाचे महत्त्व दाखवले. जगभरातील लोक बारावा रोजा पाळत असताना, सूरह हूद आणि सूरह युसुफच्या शिकवणुकीतून मिळालेले धडे विशेष महत्त्व धारण करतात. अल्लाह सर्व प्राण्यांसाठी तरतूद करतो या विश्वासाने उपवासाच्या या आव्हानात्मक महिन्यात आपल्या गरजा पूर्ण केल्या जातील अशी खात्री मिळते. भूतकाळातील पैगंबरांची वृत्तांतंनी आपल्याला आठवण करून देतात की विश्वासाचे आव्हाने नवीन नाहीत, आणि प्रतिकूल परिस्थितीत दृढता हा नेहमीच धार्मिकांचा मार्ग राहिला आहे. बारावा रोजा आपल्याला शिकवतो की जीवनात कितीही संकटे आली, कितीही विश्वासघात सहन करावा लागला, तरीही आपल्या अंतरंगात प्रेम, क्षमा आणि मानवतेची ज्योत तेवत ठेवणे हेच खरे ईमान आहे. हजरत यूसुफ (अ.स.) यांची कथा आशा, धैर्य आणि विश्वासाचे प्रतीक आहे, जे रमजानच्या या पवित्र महिन्यात रोजेदारांना प्रेरणा देते. सूरह हूद आणि सूरह युसुफमधील जटिल कौटुंबिक संबंध आपल्याला मत्सरापासून सावध राहण्याची आणि कौटुंबिक बंध टिकवून ठेवण्याची आठवण करून देतात, जे रमजान दरम्यान विशेष महत्त्वाचे आहेत. हजरत यूसुफ (अ.स.) यांचे अढळ नैतिक चारित्र्य आपल्याला मोह किंवा संकटांना सामोरे जावे लागले तरीही आपले नैतिक मानक राखण्यासाठी प्रेरित करते. या दोन्ही सूरह आपल्याला संकटात धैर्य ठेवण्याचे महत्त्व समजावतात, जे उपवासाच्या महिन्यात विशेष मूल्यवान आहे. रमजानचा बारावा दिवस कुराणातील या समृद्ध कथांमध्ये खोलवर जाण्याची परिपूर्ण संधी देतो. या कथा केवळ ऐतिहासिक वृत्तांत नाहीत तर ज्ञानाने भरलेल्या जीवंत मार्गदर्शक आहेत जे आजही आपल्या जीवनात प्रासंगिक आहेत. रोजेदारांच्या अंतरंगात या पावित्र्यमय शिकवणुकी अधिक खोलवर रुजतात आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग बनतात. सूरह यूसुफची शिकवण आपल्याला सांगते की जीवनाचे सर्वात मोठे परीक्षण म्हणजे आपल्या प्रेमाचे, आपल्या विश्वासाचे आणि आपल्या चारित्र्याचे परीक्षण. या परीक्षणात उत्तीर्ण होण्यासाठी केवळ धैर्य आणि अल्लाहवरील दृढ विश्वासच आपल्याला मार्गदर्शन करू शकतो.

# होळी रे होळी पुरणाची पोळी

मनातलं...!



• प्रणाली म्हात्रे, मुंबई



**"होळी रे होळी पुरणाची पोळी**
**साहेबाच्या पोटात बंदुकीची गोळी"**

खरं तर हे गमतीशीर गाणं आठवलं की मला गतस्मृतीमध्ये हरवलेल्या माझ्या गावच्या होळीची आठवण होते. होळी म्हणजे घरात ऊत्साहाचं वातावरण, गोडा धोडाचं जेवण आणि सर्वात मोठी होळीची खासियत म्हणजे आईच्या हातची मऊसूत गरमागरम पुरणपोळी. जीची लज्जत अजूनही जिभेवर रेंगाळतेय.

माझ्या गावी लहानपणी माझ्या घराजवळच होळी असायची. बाहेर सजवलेली होळी, रंगीबेरंगी पताकांच्या माळा, आंब्याच्या पानांची, फुलांची तोरणं, बत्ताशांच्या माळा अशी सुंदर सुशोभित केलेली होळी आणि घरात आईच्या हातच्या पुरणपोळ्यांचा सुगंध दरवळतोय अस चित्र मला आजही लख्ख आठवतंय. त्यात आम्हा मुलांचा उत्साह काय वर्णावा? आमच्या आनंदाला तर उधाणच यायचं. होळीसाठी लाकडं चोरणं हा तर तेव्हा आम्हा मुलांचा आवडता उद्योग. शेजारच्या आजीच्या चुलीजवळ ची लाकडं लांबवायची आणि तिच्या लक्षात आल्यावर तिने शिव्यांची लाखोली वाहायची हे आठवलं की अजूनही हसू आवरत नाही.

होळीच्या पूजेची सगळी जय्यत तयारी झाल्यावर आईसोबत पूजा करायला आम्ही मुलं अगदी आनंदाने जायचो. पूजेच्या ताटात प्रसादाची पुरणपोळी, नारळ, आणि पूजेचं साहित्य घेऊन आई आणि पाण्याचा कलश घेऊन मी होळीला प्रदक्षिणा घालताना अगदी हरखून जायचो.

**"सण होळीचा घन हर्षाचा**
**हर्षे उधळीला रंग प्रेमाचा"**

मग मोठं झाल्यावर आम्ही मुली आईचीच एखादी नवीन साडी नेसून मस्तपैकी सजून नटून होळी ची पूजा करायला अगदी हौसेने जात असू. मैत्रिणींसोबत मिरवताना एकमेकींच्या साड्या, बांगड्या निरखत मारलेल्या गप्पा, म्हटलेली होळीची गाणी, केलेला नाच हे सारं आठवलं ना की आजही माझं मन भरून येतं. वाटत की ती गंमत आता परत कधीच आपल्या आयुष्यात येणार नाही कारण ते बालपण आपल्यापासून कधीच दूर निसटून गेलंय. खरच त्यावेळी अनुभवलेली ती गंमत आणि तो आनंद याच वर्णन शब्दांत करता येणार नाही.

**"बालपणीच्या मधुर क्षणांनो या रे या परतुनी**
*** आतुरले मन तुमच्यासाठी आठवणीत रमुनी"***

अगदी अशीच मनाची अवस्था होते ते सारं आठवून.

पूर्वी पारंपरिक सण साजरे व्हायचे ते अगदी उत्साहाने, मनापासून आणि एकोप्याने. सर्वांनी सणासुदीला एकत्र येऊन केलेली मजा, मारलेल्या गप्पागोष्टी, त्यात लहान मुलांचं खेळणं, बागडणं हे सारं आता कुठे तरी हरवत चाललय. खरं तर होळी हा सण वर्षातील सर्वात शेवटचा. वसंत ऋतूमध्ये झाडे आपली जुनी पर्णे त्याग करून नवीन पालवी धारण करतात आणि त्याच वेळी होळी हा सण येतो. या सणाची लहानपणापासूनच ऐकलेली गोष्ट म्हणजे पुराणकाळात हिरण्यकश्यपू नावाचा राक्षसांचा राजा होता त्याला प्रल्हाद नावाचा विष्णूभक्त पुत्र होता. प्रल्हादाची विष्णूभक्ती न आवडल्याने हिरण्यकश्यपू क्रोधित होऊन प्रल्हादाला मारण्याचे अनेक प्रयत्न करतो. परंतु दर वेळी श्रीविष्णु त्याला वाचवतात. शेवटी बहीण होलिका जिला ब्रह्मदेवाने अग्निपासून अभयदान दिलेलं असतं ती होलिका प्रल्हादाला



मांडीवर घेऊन अग्निमध्ये प्रवेश करते पण तरीदेखील प्रल्हादाच्या केसालादेखील धक्का लागत नाही उलट विक्षिप्त हेतूने आपल्याला मिळालेल्या वरदानाचा दुरुपयोग करणारी होलीका जळून भस्मसात होते. पूर्वी आम्ही होळीची गाणी म्हणायचो, खेळ खेळायचो, नाचायचो हे चित्र आता कुठे दिसतच नाही. मोठ्या आवाजात लाऊडस्पिकर लावणं, आणि मजा म्हणून व्यसनाधीन झालेली तरुण पिढी असच चित्र आजकालच्या होळी सणाला पाहायला मिळतं. किती केविलवाणं आहे हे?

**"कुठे हरवला आनंद तो मोकळ्या मनांचा**
**कसा हरपला रंग तो नात्यांतल्या प्रेमाचा"**

आपल्या भारतीय संस्कृतीत सणांची कितीतरी जुनी परंपरा आहे. विविध धर्मांचे लोक विविध सण साजरे करतात. आपला महाराष्ट्र तर यात अग्रेसर आहे. कितीतरी मराठमोळे सण आपल्या पूर्वजांनी अगदी शास्त्रोक्त पद्धतीने आणि अतिशय सुंदर रीतीने साजरे करायला आपल्याला शिकवलंय. अशा सुंदर परंपरांची, सुंदर संस्कृती ची आम्ही किती जपणुक करतो बरं? उलट पाश्चात्य संस्कृतीचं अनुकुरण करून आम्ही आमची संस्कृती विसरायला बघतोय. "सणासुदीच्या नावाखाली विचित्र गोष्टी किती?

बंधन नुरले संस्कृतीचे उरली फक्त विकृती"

होळीसाठी अनावश्यक वृक्षतोड करणं कितपत योग्य आहे? त्यापेक्षा पर्यावरणसंवर्धन कसं करता येईल याचा विचार करून वाळलेली लाकडं, गवत आणि सुका कचरा होळी पेटवण्यासाठी वापरला आणि मोठ्या आवाजात डिजे लावण्यापेक्षा एकोप्याने गाणी म्हणत नाचत जर होळी साजरी केली तर तो आनंद द्विगुणित होईल. तसच पुरणपोळी, प्रसाद, नारळ होळीत टाकण्यापेक्षा तेच एकत्र गोळा करून जर एखाद्या अनाथश्रमाला दिलं किंवा गरिबांच्या वस्तीवर वाटलं तर त्यातून मिळणाऱ्या आनंदाची सर कशालाही येणं अशक्य. आपण कितीतरी नारळ होळीत टाकतो, अंडी टाकतो तेव्हा हा विचार करतो का? की या गोष्टींना लागणाऱ्या पैशांमधून माझे कितीतरी गरीब बांधव, भगिनी एक वेळच जेवण पोटभर जेवू शकतील.

होळी करायचीच झाली तर ती दुर्गुणांची करूयात, दुष्ट विचारांची करूयात. द्वेष, निंदा यांचे जळण करू. अहंकार, इर्षा, यांचे नारळ होळीत अर्पण करू. जे काही अमंगल आहे, वाईट आहे ते होळीत जळून खाक होऊदे आणि आपापसातील प्रेम, स्नेह वृद्धिंगत होऊदे अगदी मनापासून हीच भावना आमची प्रत्येकाची असली पाहिजे. प्रेम, नम्रता, शांती ने जीवन सजवून, पर्यावरण संवर्धन करून आजूबाजूचे वातावरण दूषित न करता आणि कुणाचेही मन न दुखवता जर होळी आणि रंगपंचमी हे सण साजरे केले तर खरया अर्थाने आम्ही आमच्या महाराष्ट्राची संस्कृती जपतोय अस वाटेल आणि आमच्या पुढच्या पिढीला ही तीच शिकवण मिळून परंपरा खरया अर्थाने टिकतील, जपल्या जातील.

आजही माझ्या गावाकडच्याआठवणीतल्या होळीचं मला स्मरण होऊन ते लहानपणीच गाणं मनात गुंजत राहतं.

**"होळी रे होळी पुरणाची पोळी**
**साहेबाच्या पोटात बंदुकीची गोळी"**

सांज दैनिक बीड वास्तव

सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

# प्रेम



प्रेम म्हणजे काय असतं
दोन जीवांच नातं असतं,
एकाकडून सुटलं तर
दुसऱ्यानं सावरायचं असतं.

प्रेम कसं करावं ?
जसा माळी फुलांवर करतो,
जसा कृष्ण राधेवर करतो
जसा देव भक्तांवर करतो.

प्रेमाचं नातं सुखमय असतं
जीवनाचं सुख त्यात असतं,
आनंद जीवनाच्या प्रेमात असतो
ते कळायला प्रेम करावं लागतं.

**ॲड. शितल सत्वधर**



# कडा येथील राम ढोबळे 21 मार्चपासून उपोषणाला बसणार



कडा : प्रतिनिधी
आष्टी तालुक्यातील कडा येथील सर्वे नंबर 337/1, 338/2 या सर्वे नंबरमधून रस्ता आहे. परंतु, काही लोकांनी हा रस्ता अडवला. राम ढोबळे यांना यू जा करण्यासाठी रस्ता नसल्यामुळे मोठ्या प्रमाणात कसरत करावी लागत आहे. 2016 मध्ये माननीय तहसीलदार यांना अर्ज दिला होता. परंतु, तहसीलदार यांनी जिल्हाधिकार्यालय बीड येथे अर्ज सुनावणीसाठी ठेवण्यात आला होता.

जिल्हाधिकार्यालय बीड यांनी तो निकाली काढत उपविभागीय कार्यालय पाटोदा, यांच्याकडे पाठवण्यात आला.

उपविभागीय अधिकारी यांनी तहसीलदार यांना प्रस्ताव पाठवला आहे. परंतु तहसीलदार यांनी घटनास्थळी पाहणी करुन सर्व अहवाल उपविभागीय अधिकारी पाटोदा यांना पाठवला आहे. उपविभागीय अधिकारी पाटोदा यांनी मात्र कसली ही दखल घेतली नाही. अद्यापही निकाल दिला नाही. त्यामुळे राम भाऊसाहेब ढोबळे 21 मार्च 2025 पासून उपविभागीय अधिकारी कार्यालय पाटोदा येथे कुटुंबा सह उपोषणाला बसणार आहे. तरी आमच्या कुटुंबातील व्यक्तींना काही जीवित हानी झाल्यास याला सर्वस्वी उप विभागीय अधिकारी पाटोदा हे जबाबदार राहतील, असेही शेवटी पत्रकात म्हटले आहे.



# तालुका विधी सेवा समिती व वकिल संघाचे वतीने महीला दिन साजरा

माजलगाव / प्रतिनिधी :
तालुका विधी सेवा समिती व वकील संघ माजलगाव यांचे संयुक्त विद्यमाने दि.११ मार्च रोजी पंचायत समिती माजलगाव येथे तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष श्रीमती राजश्री प.परदेशी जिल्हा न्यायाधीश -१ यांच्या मार्गदर्शनाखाली महीला दिनानिमत्य महिला दिन व कायदे विषयक जनजागृती शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ऍड. सुलभा देशमुख मॅडम यांनी केले. श्रीमती ऍड.एस.एन. जाधव मॅडम यांनी proctionction of Domestick vilance act या विषयावर मार्गदर्शन केले. अँड.बी एस घनगाव यानी Dowary prohibition act विषयावर मार्गदर्शन केले. महीला आणि त्याच्या समस्या या विषयावर जोत्सना मुळुक यांनी विषयावर मार्गदर्शन केले. तर श्रीमती आर.एस.गोसावी मॅडम दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) माजलगाव यानी जागतिक महीला दिवस या विषयावर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्रीमती के.आर.ढाले मॅडम सी.एस.पी.ओ.पंचायत समिती माजलगाव यांनी केले.

## पेट्रोल-डिझेल झालं स्वस्त

मुंबई : आज होळीच्या दिवशी महागाईने त्रस्त असलेल्या नागरिकांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. देशातील किरकोळ महागाईचा निर्देशांक 4 टक्क्यांच्या खाली आल्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या दरात कपात झाली आहे.

मुंबईत इंधन दरात मोठी घट

मुंबईमध्ये पेट्रोल आणि डिझेलच्या दरात लक्षणीय घट झाली आहे. इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या आकडेवारीनुसार, मुंबईत पेट्रोल 44 पैशांनी स्वस्त होऊन 103.50 रुपये प्रति लिटर झाले आहे, तर डिझेल 2.12 रुपयांनी स्वस्त होऊन 90.03 रुपये प्रति लिटर झाले आहे. मुंबई वगळता दिल्ली, चेन्नई आणि कोलकत्ता या महानगरांमध्ये पेट्रोल-डिझेलच्या दरात वाढ झाली आहे.

दिल्ली : पेट्रोल आणि डिझेलमध्ये प्रत्येकी 5 पैशांची वाढ होऊन दर अनुक्रमे 94.77 रुपये आणि 87.67 रुपये प्रति लिटर झाले आहेत.

चेन्नई : पेट्रोल 100.80 रुपये आणि डिझेल 92.39 रुपये प्रति लिटर.

कोलकाता : पेट्रोल आणि डिझेलमध्ये सर्वाधिक वाढ झाली आहे. पेट्रोल 1.07 रुपयांनी वाढून 105.01 रुपये, तर डिझेल 1.06 रुपयांनी वाढून 91.82 रुपये प्रति लिटर झाले आहे.

# जिभेचा रस!!

बोधकथा



एक म्हातारा प्रवासी थकला आणि राहण्यासाठी जागा शोधू लागला. एका बाईने त्याला तिच्या घरामध्ये राहण्याची जागा सांगितली. म्हातारा तिथे शांत झोपला. सकाळी उठल्यावर त्याला वाटले की ही चांगली जागा आहे, इथे खिचडी शिजवावी. आणि मग ते खाल्ल्यावर आपण पुढचा प्रवास करू शकतो.

म्हाताऱ्याने तिथे पडलेली सुकी लाकूड गोळा केली आणि विटांची चूल करून खिचडी बनवायला सुरुवात केली त्याने ती त्याच बाईकडे बटलोई मागितली. त्या म्हाताऱ्याने त्या बाईचे लक्ष दुसरीकडे वळवले आणि म्हणाला, 'एक गोष्ट सांगू का?' बंदिस्त दरवाजा कमी रुंद आहे. समोरची धष्टपुष्ट म्हैस मेली तर उचलून बाहेर काढणार कशी?' या विनाकारण कडू बोलण्याचं त्या बाईला वाईट वाटलं, पण तो म्हातारा आहे आणि काही वेळाने निघून जाणार आहे, मग त्याबद्दल कशाला बोलावं असं समजून ती गप्प राहिली. दुसरीकडे, बाई काही कामासाठी कुंपणावरून जात असताना चुलीवरची खिचडी अर्धीच शिजली होती. यावेळी म्हातारा पुन्हा तिला म्हणाली, 'तुझ्या हातातील बांगडी खूप मौल्यवान दिसते. विधवा झालास तर तोडावे लागेल, नाहीत खूप नुकसान होईल.'
यावेळी महिलेला सहन न झाल्याने तिने धावत येऊन वृद्धाच्य भांड्यात अर्धी शिजलेली खिचडी उलटवली आणि चुलीच्या आगीवर पाणी ओतले. त्याने त्याचे बटलॉई हिसकावले आणि वृद्धाला ढकलून दिले.

मग म्हाताऱ्याला आपली चूक कळली, माफी मागितली आणि पुढे निघाले. अर्ध्या शिजलेल्या खिचडीचे पाणी त्याच्या भांड्यातून टपकत राहिले आणि सर्व कपडे खराब होत राहिले. वाटेत लोकांनी विचारले, 'हे सर्व काय आहे?' म्हातारा म्हणाला, 'माझ्या जिभेतून टपकणारा हा रस आहे, जो आधी तुच्छतेने कारणीभूत होता आणि आता हसतो आहे.'

## बोध

अर्थ आधी तोलून मग बोला. तुम्ही कमी बोललात तरी कितीही बोलाल, गोड बोला आणि विचारपूर्वक बोला..!
हा मराठी मजकूर शब्दांच्या सामर्थ्याबद्दल एक नैतिक कथा सामायिक करतो. येथे एक सारांश आहे :

## कथा सारांश

एक वृद्ध प्रवासी आसरा शोधतो आणि खिचडी शिजवतो. तो अनावश्यक, कटू टीका करतो, त्याच्या यजमानांना चिडवतो. ती त्याच्या जेवणाची नासाडी करून, त्याला धडा शिकवून बदला घेते.

## नैतिक

१*विचारपूर्वक भाषण* : बोलण्यापूर्वी परिणामांचा विचार करा.
2. दयाळूपणा : दुखावणारे शब्द टाळून हळूवारपणे बोला.
3. नम्रता : चुका ओळखा, माफी मागा.

की टेकअवेज
1. शब्दांचा प्रभाव असतो.
2. कडू शब्द हानी करतात.
3. सौम्य शब्द शांत करतात

## 'या' वेळेत मेट्रो राहणार बंद

पुणे : मेट्रोच्या प्रवाशांसाठी महत्त्वाची सूचना : होळी/धुळवड सणामुळे शुक्रवार, 14 मार्च 2025 रोजी सकाळी 6 ते दुपारी 3 वाजेपर्यंत मेट्रो सेवा बंद राहील. केंद्रीय नागरी विमान वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी ट्विटरद्वारे ही घोषणा केली.

मेट्रो सेवेची वेळ : सकाळी 6 ते दुपारी 3 : मेट्रो सेवा बंद राहील.
दुपारी 3 ते रात्री 11 : मेट्रो सेवा नेहमीप्रमाणे सुरू राहील.
सुरक्षा व्यवस्था : पुणे मेट्रोने सर्व स्थानके आणि प्लॅटफॉर्मवर सुरक्षा व्यवस्था कडक करण्याची योजना आखली आहे.

# माजलगाव शहरासह तालुक्यातील मटका बंद करा

● पान १ वरून...

बीड जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसापासून अवैध धंदे वाढले होते गुंडगिरी वाढली होती या सर्व गोष्टींना आळा घालण्यासाठी तरुण तडफदार पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांना महाराष्ट्र सरकारने नियुक्त केले त्यांनीही आपली धडाडीची कारकीर्द दाखवत बीड जिल्ह्यातील गुटका किंग, वाळू किंग, तसेच गुडांचे आका यांच्यावर जरब निर्माण केली यामुळे कावतांची दहशत कुठेतरी फावत आहे याचे दर्शन बीड जिल्ह्याला झाले मात्र मटका जुगार राजरोसपणे माजलगाव शहरासह ग्रामीण भागात चालू आहे आपण एक रुपया लावला तर नव्वद रुपये मिळणार या आशेने मजुरी काम करणारे महिला पुरुष यामध्ये भरडले जात आहेत मटका तर लागतच नाही मात्र अशा खूप वाईट असते आज ना उद्या आपल्याला मटका लागेल या हेतूने रोजंदारी करणारे मजूर आपण दिवसभर केलेल्या कामाचे पूर्ण पैसे मटक्यावर लावत आहेत आणि दुसऱ्या दिवशी मटका न लागल्यामुळे गृहकलह करून संपूर्ण कुटुंब उपाशी झोपत आहे कावत साहेब मजुरीचे पैसे आम्हाला पुरतात मात्र माजलगाव तालुक्यातील मटका बंद व्हायला हवा अशी आरत हाक मजूर कुटुंबीयांच्या महिला पोलिसांसह, पत्रकारांना देत आहेत ही हाक ऐकून माजलगाव पत्रकारांच्या वतीने पोलीस अधीक्षक नवनीत कावत ज्यांच्याकडे निवेदन देऊन माजलगाव शहरास ग्रामीण तालुक्यातील मटका बंद करावा अशी मागणी करण्यात आली आहे याचे प्रतिलिपी निवेदन माजलगाव पोलीस ठाणे शहर, माजलगाव पोलीस ठाणे ग्रामीण यांना देण्यात आलेले आहे यावर तात्काळ कारवाई न झाल्यास तालुक्यातील जनतेच्या वतीने जनतेसह पत्रकार तीव्र आंदोलन करतील याची दक्षता पोलीस प्रशासनाने घ्यावी असा इशाराही देण्यात आलेला आहे.

## सहज...!



• स्वरुपा जोशी

# डाळ कांदा
## हटके रेसीपी तुम्ही कधी करून पाहिलीय का?

कधीकधी वेगळा प्रकार करून बघायची हुकी येते.. आज डाळ कांदा करुन बघितला..

1 वाटी हरभरा डाळ 2 तास भिजवून ठेवली.. कुकरमध्ये 2 शिट्ट्या काढून बोटचेपी शिजवून घेतली.. 3 मध्यम कांदे, 1 मध्यम टोमॅटो 7,8 लसूण पाकळ्या बारीक चिरून घेतले. फोडणीत तमालपत्र, दालचिनी, मेथ्या, काळी मिरी, लवंग, मोठ्या वेलचीचे दाणे, शहाजिरे घालून परतले त्यात कांदा, टोमॅटो, लसूण कच्चा वास जाईपर्यंत परतले. शिजवलेली हरभरा डाळ घातली. चवीनुसार मीठ घातले. चव adj करायला लहानसा गुळाचा खडा घातला. गरमागरम डाळ कांद्यावर बारीक चिरलेली कोथिंबीर घातली..

डाळ कांदा बासमती तांदळाच्या भातासोबत झकास लागेल असे as-sume करून बासमती तांदळाचा भात केला होता.. बासमती तांदळाचा मंद सुगंध आणि डाळ कांदा हे combination खरोखरच अफाट, भन्नाट लागले.




# महा जम्बो शब्दकोडे

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | | ■ | ५ | ६ | ■ | ७ | ८ | ■ | ९ | |
| १० | | ■ | ११ | | ■ | १२ | | | १३ | | | १४ | | ■ |
| | ■ | १५ | ■ | १६ | १७ | | | ■ | १८ | | ■ | | ■ | १९ |
| २० | २१ | | | ■ | | ■ | २२ | | ■ | २३ | | ■ | २४ | |
| ■ | २५ | | ■ | २६ | ■ | २७ | | ■ | २८ | | ■ | २९ | | |
| ३० | | ■ | ३१ | | ३२ | ■ | ■ | ३३ | | | ३४ | ■ | | ■ |
| ३५ | | | ■ | ३६ | | ३७ | | ■ | | ■ | ३८ | ३९ | ■ | ४० |
| ४१ | | ■ | ४२ | ■ | ४३ | | ■ | ४४ | ■ | ४५ | | | | |
| | ■ | ४६ | | ४७ | ■ | ४८ | ४९ | | | ■ | ■ | | ■ | |
| ५० | ५१ | ■ | ५२ | | ५३ | ■ | ५४ | | ■ | ५५ | ५६ | ■ | ५७ | |
| ५८ | | ■ | | ■ | ५९ | ६० | ■ | ■ | ६१ | ■ | ६२ | | | ■ |
| ■ | ६३ | | ■ | ६४ | | | ६५ | ६६ | ■ | ६७ | | ■ | ६८ | |
| ६९ | | ■ | ७० | ■ | | ■ | ७१ | | ७२ | ■ | ७३ | ७४ | | ■ |
| | ■ | ७५ | | | ■ | ७६ | ■ | ७७ | | ७८ | ■ | | ■ | ७९ |
| ८० | | | | ■ | ८१ | | | | ■ | ८२ | | | | |

### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट


### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | ■ | धु | ■ | टो | क | दा | र |
| सा | ग | र | ■ | म | ■ | स | ई | प | रां | ज | पे | ■ | दा | स |
| ■ | न | ■ | द | ■ | वा | र | स | ■ | डे | रा | ■ | लू | ■ | वं |
| अ | म | री | श | पु | री | ■ | ■ | म | ■ | सं | क | ट | ■ | ती |
| ना | त | ■ | र | त | ■ | चौ | क | शी | ■ | ध | ■ | मा | घ | ■ |
| थ | ■ | र | थ | ■ | मा | का | ■ | द | र | ■ | खा | र | ■ | क |
| ■ | मो | द | ■ | क | ल | र | व | ■ | वा | ट | प | ■ | त | म |
| मे | ह | न | त | ■ | व | ■ | जी | व | न | ■ | र | ख | वा | ला |
| ह | र | ■ | ■ | क | ण | ख | र | ■ | गी | त | ■ | रू | ■ | ■ |
| बू | ■ | स | व | ड | ■ | प | ■ | उ | ■ | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | ■ | रा | ■ | उ | दा | ह | र | ण | ■ | श | र |
| ■ | त्न | ■ | रा | ज | धा | नी | ■ | स | ल | ■ | जी | व | ■ | बे |
| न | मा | ज | ■ | न्म | ■ | ल | ग्न | ■ | का | ■ | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | ■ | ना | म | ■ | भी | ■ | अ | ■ | पा | ■ | ■ |
| ली | ■ | त | ग | म | ग | ■ | स | म | ज | दा | र | ■ | शो | ध |

# मा. सदानंद भैय्या प्रधान यांच्या वाढदिवसानिमित्त भैय्यासाहेब प्रतिष्ठानतर्फे विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन






**माजलगाव : अरविंद ओव्हाळ**

**- समाजसेवा आणि लोककल्याणकारी कार्याचा वसा घेतलेल्या मा. सदानंद भैय्या प्रधान यांच्या वाढदिवसानिमित्त भैय्यासाहेब प्रतिष्ठान, माजलगाव यांच्या वतीने विविध सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले. या उपक्रमांमुळे अनेक गरजू नागरिक, विद्यार्थी आणि सामाजिक संस्थांना थेट लाभ मिळाला.**



## स्थानीय नागरिकांचा सकारात्मक प्रतिसाद

● भैय्यासाहेब प्रतिष्ठानच्या या सामाजिक उपक्रमांचे परिसरातील नागरिकांनी मन :पूर्वक स्वागत केले . गरजूंसाठी राबवलेल्या या उपक्रमांमुळे अनेकांना थेट लाभ झाला . सामाजिक बांधिलकी जपत गरजूंसाठी मदतीचा हात पुढे करणाऱ्या आयोजकांचे नागरिकांनी भरभरून कौतुक केले . "समाजासाठी केलेली सेवा हीच खरी समाजसेवा असते," या भावनेतून राबवलेले हे उपक्रम नक्कीच प्रेरणादायी ठरतील

## गोषाळांसाठी चारा वाटप व जन कल्याण उपक्रम :

● पशुपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना मदत करण्याच्या उद्देशाने गोशाळेसाठी चारा वाटप करण्यात आले . तसेच, उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पाणपोई स्थापन करून नागरिकांना थंड पाण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली .

## शिक्षणासाठी मदतीचा हात :

● गरजू विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य वाटप कार्यक्रम घेण्यात आला . यात नोटबुक, वह्या, पेन, पेन्सिल, दप्तरे आणि गणवेश वाटप करण्यात आले . शिक्षणाच्या प्रवाहात कोणताही विद्यार्थी मागे राहू नये, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता .



## सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम :

● या विशेष उपक्रमांतर्गत फळ वाटप, शालेय साहित्य वाटप, रक्तदान शिबिर, स्नेहभोजन, गोशाळेसाठी चारा वाटप, पाणपोई स्थापन, साडी वाटप, राशन किट वाटप आणि वृक्षारोपण यांचा समावेश करण्यात आला . या कार्यक्रमाच्या माध्यमातून गरजू कुटुंबांना आधार देण्याचा प्रयत्न करण्यात आला .

● विशेषत : कॅन्सरग्रस्त सय्यद सलीम यांना आर्थिक मदत देण्यात आली, ज्यामुळे त्यांच्या कुटुंबीयांना थोडासा दिलासा मिळू शकला . तसेच, रक्तदान शिबिरात ७० रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला, ज्यामुळे अनेक गरजू रुग्णांना आवश्यकतेच्या वेळी रक्त उपलब्ध होणार आहे .



## पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षारोपण उपक्रम

● पर्यावरण संतुलन राखण्याच्या दृष्टीने वृक्षारोपण मोहीम राबवण्यात आली .

● शहरातील शाळा, महाविद्यालये आणि सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपण करून हिरव्या माजलगावचा संकल्प करण्यात आला .

## कार्यक्रमास मान्यवरांची उपस्थिती

● या कार्यक्रमाला बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक बाबुराव पोटभरे, कचरू खळगे, राजेश साळवे, नवनाथ धाईजे, प्रदीप पट्टेकर, नगर परिषदेचे कार्यालयीन अधीक्षक विघ्नेश मुंडे, न.प. अभियंता अजय मुंडे, तसेच जि.प.प्रा. शाळेचे मुख्याध्यापक टोपे सर आदी मान्यवर उपस्थित होते . कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पडवळ सर यांनी केले, तर प्रमुख मान्यवरांच्या हस्ते विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले .

## ना.अजितदादा पालकमंत्री असल्यामुळे पाच वर्षांत बीड जिल्ह्याचा बारामतीसारखा विकास होईल

● पान १ वरून . . . यासोबतच बीड शहरातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी विशेष बाब म्हणून नगरपालिकेकडील वीजबिल भरण्यासाठी निधीची तरतूद करावी त्यामुळे या उन्हाळ्यात खूप मोठा दिलासा बीड शहरातील नागरिकांना मिळेल . टुकूर साठवण तलाव प्रकल्पात सन २००३ मध्येच कार्यारंभ आदेश मिळालेले आहेत परंतु याला असलेल्या स्थानिकांच्या विरोध असल्यामुळे हे काम होऊ शकले नाही . त्यावर मार्ग काढून एकाच ठिकाणी साठवण तलाव करण्याऐवजी चार विविध ठिकाणी बंधारे केल्यास तलावाइतक्याच क्षमतेने पाणी साठवणूक होईल . आणि हे सर्व तलाव प्रकल्पाला लागणाऱ्या रकमेच्या अर्ध्याच रकमेत होणारा प्रकल्प आहे . त्यामुळे या महत्त्वाच्या प्रकल्पाला निधी द्यावा . तसेच शिरूर कासार तालुक्यातील फुलसांगवी येथील २ .८३ द .ल .घ .मी . क्षमतेचा साठवण तलाव आहे . परंतु पावसाळ्यातील बदलामुळे तलाव भरण्यासाठी अडचण निर्माण होते . त्यामुळे येथीलच सिंदफणा नदीवर मोठ्या क्षमतेचा बंधारा तयार केल्यास किंवा इतर पर्यायी उपयुक्त मार्गाचा अवलंब करून उपसा जलसिंचन किंवा कॅनॉलद्वारे पाणी तलावात सोडल्यास तलाव पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी कायमस्वरूपी मार्ग निघेल . परिणामी परिसरातील अनेक गावांच्या सिंचनाचा प्रश्न सुटेल . त्यामुळे या कामाकरिता निधी देण्यात यावा . त्यासोबतच बीड शहरातील भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उंची वाढविणे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळ्याची उभारणी करणे, स्व .अण्णासाहेब पाटील व स्व .विनायकराव मेटे यांचा पुतळा पंचायत समिती आवारात बसविणे आदी कामांना निधी देण्यात यावा अशी मागणी आ .संदीप क्षीरसागर यांनी सभागृहात केली . बीड मतदारसंघाच्या विकासासाठी अतिमहत्वाच्या असलेल्या विविध प्रस्तावित कामांना निधी आणि मंजुरी देण्याची मागणी आ .संदीप क्षीरसागर यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली

## योगतज्ञ राधा तांबे यांना महिला दिनानिमित्त सेवा रत्न पुरस्कार

● पान १ वरून . . . नुकताच अंबड येथे झालेल्या प्रादेशिक मारवाडी युवा मंच तर्फे देखील जागतिक महिला दिनानिमित्त श्रीमती तांबे यांना नारीरत्न पुरस्काराने सन्मानित केले गेले . त्यानंतर त्यांना बीड जिल्ह्यातला नामांकित सेवा रत्न पुरस्कार जाहीर झाला . योग क्षेत्रात श्रीमती तांबे आपल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे जिल्ह्याभरात विख्यात आहेत . आजवर त्यांना सामाजिक योगदानाबद्दल विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले ही त्यांच्यासाठीच नव्हे तर बीड जिल्ह्यासाठी देखील गौरवाची बाब आहे . हा पुरस्कार प्राप्त झाल्याने त्यांनी पसायदान सेवा प्रकल्प ( वंचितांचे हक्काचे घर )ढेकणमोह ता . जि .बीड या स्वयंसेवी संस्थेचे श्री .दराडे कुटुंब व श्रीमती विधाते ताई यांचे आभार मानले व पुढे देखील योगाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण आणि सशक्तीकरण करण्यात काही कसूर न ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला . माता भगिनीने संघर्षावर मात करून परिस्थिती बदलली पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले

## जिल्ह्यातील शाळा दुपारच्या सत्रात बेकादेशीर रितीने बंद

● पान १ वरून . . . करण्याची मागणी करावी .

शिक्षण हे वाघिणीचे दूध म्हटलं जातं . मात्र दहावी आणि बारावीच्या परीक्षा पाहता परीक्षेतील कॉपी मुळे शिक्षणाचा दर्जा ढासळलेला आहे . त्यातच आता शाळा बंद ठेवल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे . जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अचानक फेरफटका मारला आणि विद्यार्थ्यांची विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले तर त्यांना गुणाकार, भागाकार अशा मूलभूत क्रिया देखील येत नाहीत . त्याचप्रमाणे इंग्रजीचा आणि विद्यार्थ्यांचा अनेक ठिकाणी गंध नाही . हे देखील दिसून येईल . त्यामुळे शिक्षणाचा दर्जा ढासळव होणाऱ्या या दोषी शिक्षकांवर कारवाई करून त्यांचे पगार कपात करावेत, अशी मागणी ही ॲड . देशमुख यांनी केली आहे .

## गोमळवाडा येथे छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीसुर्य महात्माफुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयूक्त जयंती उत्साहात साजरी

● आपण सर्व माणूस व भारतीय म्हणून एकच - तहसीलदार सुरेश घोळवे ● सामाजिक सलोखा वाढीसाठी आजीनाथ गवळीं दिलेल्या हाकेला नागरीकांचा प्रतिसाद





शिरूर कासार : प्रतिनिधी

गोमळवाडा येथे सामाजिक सलोख्याची हाक देत छ .शिवाजी महाराज, क्रांतीसुर्य महात्माफुले व भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली व यावेळी प्रथम स्व .संतोष देशमुख यांना श्रद्धांजली अर्पन करून या निमित्ताने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारीत "छावा" चित्रपटाचा शो दाखविण्यात आला .तर सामाजिक सलोखा वाढीसाठी आजीनाथ गवळीं दिलेल्या हाकेला नागरीकांचा उदंड प्रतिसादमिळाला .यावेळी संत–महंत, मान्यवर यांचेसह नागरीकांची मोठया संख्येने उपस्थिती होती .

सध्या जिल्हामधे जातीय सलोखा व सामाजिक वातावरण खूपच दुषित झालेले असून हे वातावरण बदल्याची गरज असून पुन्हा जातीय सलोखा निर्माण व्हावा या उद्देशाने छ .शिवाजी महाराज, क्रांतीसुर्य महात्माफुले व भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी करून सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांनी सामाजिक सलोख्याची हाक देत कार्यक्रमाचे आयोजन केले होते .या कार्यक्रमाचे उदघाटन श्रीराम संस्थानचे महंत ह .भ .प .भानुदास महाराज शास्त्री यांच्या हस्ते झाले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार सुरेश घोळवे हे तर व्यासपिठावर ह .भ .प .भगवान महाराज बारगजे, चेअरमन वैशाली गवळी, जेष्ट पत्रकार विजयकुमार गाडेकर, गोकुळ पवार, भारतकुमार पानसंबळ, प्रकाश साळवे, संचालक रमेश जरांगेसर, लोकनेते गोपीनाथ मुंडे पतसंस्थेचे उपाध्यक्ष लखूळ मुळेसर, स्वच्छतादुत योगीता गवळी, व्यवस्थापक राम सुरे आदींची उपस्थिती होती .यावेळी महंत भानुदास शास्त्री म्हणाले की थोर नेत्यांचे विचार अंगीकारून सर्वांनी एकत्र येऊन काम करण्याची गरज आहे असे सांगितले तर अध्यक्षीय समारोपात तहसीलदार घोळवे म्हणाले की आपण सर्व विभन्न आहेत परंतु सगळे माणसच आहोत असून आपण सर्व भारतीय असल्याचे सांगुन एकता व समतेचा संदेश दिला .यावेळी शिवसेना ता .प्रमुख सोपन मोरे व पत्रकार गोकुळ पवार यांनी मनोगत व्यक्त करून आयोजकांनी जातीय सलोख्या चांगला प्रयत्न केला आहे असे सांगितले .या कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक एकतेच्या उद्देशाने सिंदफणा अर्बनच्या वतीने करण्यात आले होते .कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन शिवव्याख्याते कैलास तुपेसर यांनी केले तर आभार सचिव महादेव कातखडेसर यांनी मानले .

## 'जय महेश' गाळपात मराठवाड्यात अव्वल

### ● डिस्टीलरी विस्तारी करण्याचे काम प्रगती पथावर ! - उपाध्यक्ष वेंकट राव

माजलगाव :

तालुक्यातील पवारवाडी येथील जय महेश कारखान्याने ८ लाख ९ हजार २४२ टन उसाचे गाळप करत मराठवाड्यामध्ये अव्वल येण्याचा बहुमान मिळवला असून, कारखान्याने उस उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त भाव देण्याचा प्रयत्न केल्याचे कारखान्याचे उपाध्यक्ष वेंकट राव यांनी सांगितले . तालुक्यातील पवारवाडी येथील जय महेश साखर कारखान्याच्या गाळप हंगाम सांगता कार्यक्रमात ते बोलत होते . कारखान्याचे मुख्य शेतकी अधिकारी सुजय पवार व पत्नी साधना पवार यांच्या हस्ते विधीवत पूजा या प्रसंगी करण्यात आली . या वेळी वेंकट राव म्हणाले की, ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विश्वासावरच जय महेश कारखान्याची यशस्वी वाटचाल सुरू आहे . या कारखान्याने उसाला स्पर्धात्मक भाव देण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे .आगामी काळातही ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त भाव मिळावा, यासाठी डिस्टिलरी प्रकल्पाचे विस्तारीकरण करण्याचे काम हाती घेतल्याचे ते म्हणाले . यावेळी तोडणी वाहतूक कंत्राटदार, प्रत्येक विभागातील प्रगतशील शेतकऱ्यांचा सत्कार व पारितोषिके देऊन गौरविण्यात आले .



## सन पेस इंटरनॅशनल स्कूलचे चे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

माजलगाव / प्रतिनिधी :

तालुक्यातील गंगामसला येथील सन पेस इंटरनॅशनल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले . यावेळी चिमुकल्यांनी मराठी, हिंदी गीतावर बहारदार नृत्य सादर करत विविध कलागुणांचे प्रदर्शन केले .

स्नेह संमेलनाचे अध्यक्ष गटशिक्षणाधिकारी रविंद्र महामुनी होते . यावेळी गंगामसलाचे सरपंच भालचंद्र सोळंके, गुंजथडीचे सरपंच समीर यादव, शुक्लतीर्थ निमगावचे सरपंच कृष्णा थावरे, छोटे वाडीचे सरपंच अंगद कटके, संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मण पोटभरे, सचिव लक्ष्मीकांत सोळंके यांची प्रमुख उपस्थिती होती .

प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना लक्ष्मण पोटभरे म्हणाले की, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी व विद्यार्थी परिपूर्ण जीवन कसा जगेन यासाठी सनपेस इंटरनॅशनल स्कूल प्रयत्न करणार आहे . तसेच ज्या सुविधा शहरात मिळतात त्याच सुविधा गंगामसला या ठिकाणी देण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे .

अध्यक्षीय समारोप करताना गटशिक्षण अधिकारी रवींद्र महामुनी म्हणाले की, मुलांना इंग्रजी माध्यमाबरोबरच मराठी भाषेचेही ज्ञान अवगत झाले पाहिजे त्यासाठी शाळांनी प्रयत्न करावेत . गुणवत्तापूर्व शिक्षणामुळे या शाळेचे भविष्य उज्वल दिसून येते आहे . यावेळी गंगामसल्याचे सरपंच भालचंद्र सोळंके व संस्थेचे सचिव लक्ष्मीकांत सोळंके यांनी मनोगत व्यक्त केले .

स्नेहसंमेलनामध्ये बाल कलाकारांनी लावणी, बॉलिवूड तसेच देशभक्तीपर गीतावर बहारदार नृत्य तसेच विविष कला सादर करून कलाविष्कार दाखवीला . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक डोंगरे व कल्पना सोळंके यांनी केले तर गणेश सोळंके यांनीआभार मानले .यावेळी विद्यार्थी ,पालक, शाळेचे शिक्षक वृंद पालक उपस्थित होते